अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | मंगळवार
१०.११.२०२६

वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २८० | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२


संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

दिवाळीसाठी निघाले, एक चूक आणि सगळे जिवंत जळाले

कार अपघातामध्ये ६ मित्रांचा मृत्यू, संपूर्ण गाव सुन्न!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





मुजफ्फरनगर - उत्तर प्रदेशातील मुजफ्फरनगर जिल्ह्यात झालेल्या भीषण कार अपघातात सहा तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. दिवाळीचा सण साजरा केल्यानंतर हरिद्वारला गंगास्नानासाठी निघालेल्या सहा मित्रांच्या कारला पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाला.

भरधाव कार विजेच्या खांबाला धडकून डिव्हायडर ओलांडत दुसऱ्या बाजूला पलटी झाली. त्यानंतर कारने पेट घेतला. आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने कारमधील सहाही तरुणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन सख्ख्या भावांचाही समावेश आहे. या घटनेमुळे हरियाणातील त्यांच्या गावांमध्ये शोककळा पसरली आहे. सदर घटना ९ नोव्हेंबर २०२६ रोजी पहाटे सुमारे पाच वाजण्याच्या दरम्यान घडली. उत्तर प्रदेशातील मुजफ्फरनगर जिल्ह्यातील तितावी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जगाहेडी गावाजवळ पानीपत-खटीमा राष्ट्रीय महामार्गावर हा अपघात झाला. प्राथमिक माहितीनुसार, सहा मित्र हुंदाई ऑरा कारमधून हरियाणातील हिसार येथून हरिद्वारच्या दिशेने जात होते. कार वेगात असताना चालकाचे नियंत्रण सुटले. कार सर्वप्रथम रस्त्याच्या कडेला असलेल्या विजेच्या खांबाला धडकली. त्यानंतर डिव्हायडर तोडून कार दुसऱ्या बाजूच्या रस्त्यावर पलटी झाली. या धडकेनंतर कारने अचानक पेट घेतला आणि काही क्षणांतच आगीने संपूर्ण कारला वेढले.

सदर अपघातात मृत्यू झालेल्या सहाही तरुणांची ओळख पटवण्यात आली आहे. हे सर्व हरियाणातील हिसार जिल्ह्यातील रहिवासी होते. मृतांमध्ये राहुल आणि अंकित हे दोन सख्खे भाऊ होते. यातील चार तरुण राखीगढी गावातील, तर दोन तरुण मोठ लुहारी गावातील रहिवासी होते. मृतांपैकी काहीजण शिक्षण घेत होते, तर काहीजण काम करत होते. या सहाही मित्रांचे वय साधारण १९ ते २३ वर्षांच्या दरम्यान असल्याचे वृत्त आहे.गाडीला आग लागल्यानंतर बचावकार्य-अपघातानंतर कारमध्ये भीषण आग लागल्याने आत अडकलेल्या तरुणांना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही.

घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी जवळपास तासभर प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र, तोपर्यंत कारमधील सहाही तरुणांचा मृत्यू झाला होता. आग इतकी भीषण होती की मृतदेह मोठ्या प्रमाणात जळाले होते. त्यानंतर कारच्या खिडक्या तोडून आणि छताचा काही भाग हटवून मृतदेह बाहेर काढण्यात आले.

गड आला पण सिंह गेला, जेव्हा राजेश पाटलांच्या पराभवाने अजितदादांनी फेटा बांधायला नकार दिला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



नाशिक - गेल्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्राच्या राजकीय आणि सहकार क्षेत्रातील वातावरण ढवळून काढणाऱ्या गोकुळच्या अध्यक्षपदाची निवडणूक आज पार पडत आहे. या निवडणुकीसाठी समविचारी आघाडीकडून शशिकांत पाटील-चुयेकर, तर महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार राजेश पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. थोड्याचवेळात या निवडणूक प्रक्रियेला सुरुवात होऊन गोकुळचा नवा अध्यक्ष निवडला जाईल. चार सरकारी संचालकांची मतं महायुतीला मिळण्याची शक्यता असल्याने राजेश पाटील यांचा विजय निश्चित मानला जात आहे. या पार्श्वभूमीवर गोकुळ शिरगावच्या परिसरातच महायुतीच्या नेत्यांनी स्टेज उभारले आहे. मंत्री चंद्रकांत पाटील, हसन मुश्रीफ, संजय मंडलिक यासह महायुतीचे अनेक नेते स्टेजवर उपस्थित आहेत. आज अध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजय झाल्यास याठिकाणी महायुतीकडून जल्लोष केला जाईल.

गोकुळच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीवरुन कोल्हापुरातील वातावरण प्रचंड तापल्याने महायुतीमधील तिन्ही पक्ष पहिल्या टर्मचे अध्यक्षपद घ्यायला तयार नव्हते, अशी चर्चा होती. मात्र, मंगळवारी सकाळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजेश पाटील यांचे नाव महायुतीकडून गोकुळच्या अध्यक्षपदी जाहीर करण्यात आले. राजेश पाटील हे कोल्हापूरच्या राजकारणातील अनुभवी नेतृत्व आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राजेश पाटील यांच्यात एक खास ऋणानुबंध होता. राजेश पाटील यांचा २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे बंडखोर शिवाजी पाटील यांच्याकडून पराभव झाला होता.आज राजेश पाटील यांना गोकुळच्या अध्यक्षपदाची उमेदवारी मिळाल्यानंतर अजित पवार यांचे हे भाषण सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

पात्र लाभार्थी अन्न सुरक्षेपासून वंचित नको! राज्य अन्न आयोगाची सरकारला सूचना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई - पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेच्या लाभार्थ्यांची पडताळणी करताना एकाच रेशनकार्डवर समाविष्ट असलेल्या कुटुंबातील एखादा सदस्य अपात्र ठरल्यास संपूर्ण कुटुंबाला योजनेच्या लाभापासून वंचित ठेवू नये. प्रत्येक प्रकरणाची प्रत्यक्ष क्षेत्रीय पडताळणी करून पात्र लाभार्थ्यांचा अन्नधान्याचा लाभ कायम ठेवावा, अशी महत्त्वपूर्ण सूचना राज्य अन्न आयोगाने राज्य सरकारला केली आहे तसेच अपात्र ठरवून लाभ बंद केलेल्या नागरिकांपैकी पात्र असलेल्यांचा लाभ तातडीने पूर्ववत करण्यात यावे, असेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार शिधापत्रिका प्रणालीतील व्यवस्थापन शिधापत्रिकांच्या माहितीची प्राप्तिकर विभाग, केंद्रीय अप्रत्यक्ष कर मंडळ, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय तसेच पीएम किसान योजनेच्या डेटाबेसशी पडताळणी करण्यात आली आहे. या आधारे अपात्र लाभार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतून वगळण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, ही कार्यवाही करताना प्रत्येक प्रकरणाची प्रत्यक्ष पडताळणी करावी आणि केवळ संशयाच्या आधारे पात्र लाभार्थ्यांना योजनेपासून वंचित ठेवू नये, असे राज्य सरकारनेही स्पष्ट केले आहे. आयोगाकडे तक्रारी राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी राज्य सरकारला पाठवलेल्या पत्रात या प्रक्रियेतील त्रुटींवर लक्ष वेधले आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी संयुक्त कुटुंब पद्धती असल्याने एकाच शिधापत्रिकेवर दोन किंवा अधिक स्वतंत्र कुटुंबे वास्तव्यास असतात. अशा वेळी कुटुंबातील एखादा सदस्य प्राप्तिकर भरत असल्यास किंवा त्याच्या नावावर चारचाकी वाहन असल्यास संपूर्ण शिधापत्रिकेवरील लाभार्थ्यांना अपात्र ठरवले जात असल्याच्या तक्रारी आयोगाकडे प्राप्त झाल्या आहेत.

आठ महिन्यांपासून बंद असलेली एबीजी मशीन अखेर सुरू

शिवाजी महाराज रुग्णालयातील अनागोंदी कारभार चव्हाट्यावर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



ठाणे - गंभीर रुग्णांच्या उपचारांसाठी महत्त्वाची असलेली एबीजी तपासणी मशीन आठ महिन्यांपासून बंद असल्याचा धक्कादायक प्रकार ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उघडकीस आला आहे. अतिरिक्त आयुक्त-२ मेजर डॉ. नितीन राठोड यांनी अचानक केलेल्या पाहणीत हा प्रकार समोर आला.

आठ महिने ही मशीन दुरुस्त करण्याचा प्रयत्न रुग्णालय प्रशासनाने कोणतीही ठोस कार्यवाही केली नव्हती. डॉ. राठोड यांनी नाराजी व्यक्त करताच मशीन सुरू करण्यासाठी तातडीने हालचाली झाल्या. अखेर ही मशीन कार्यान्वित झाल्याने गंभीर रुग्णांना दिलासा मिळाला आहे.

ठाणे महापालिकेचे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय हे ठाण्यासह मुंब्रा, दिवा, कळवा, कल्याण, उल्हासनगर आणि शहापूर परिसरातील गरीब व सर्वसामान्य रुग्णांसाठी महत्त्वाचे उपचार केंद्र आहे. येथे गंभीर रुग्णांसाठी आवश्यक एबीजी मशीनच्या माध्यमातून रुग्णाच्या रक्तातील ऑक्सिजन, कार्बन डायऑक्साईड, पीएच आणि अन्य महत्त्वाच्या घटकांची तपासणी केली जाते.

विशेषतः अतिदक्षता विभागातील आणि श्वसनाचा त्रास असलेल्या गंभीर रुग्णांच्या उपचारांची दिशा ठरविण्यासाठी ही तपासणी महत्त्वाची असते. त्यामुळे ही मशीन आठ महिने बंद असणे ही बाब आरोग्य व्यवस्थेतील गंभीर त्रुटी मानली जात आहे.

गंभीर रुग्णांसाठी मशीन आवश्यक एबीजी मशीनच्या माध्यमातून रुग्णाच्या रक्तातील ऑक्सिजन, कार्बन डायऑक्साईड, पीएच आणि अन्य महत्त्वाच्या घटकांची तपासणी केली जाते. त्यामुळे ही मशीन आठ महिने बंद असणे ही बाब आरोग्य व्यवस्थेतील गंभीर त्रुटी मानली जात आहे.

अजित पवारांच्या घातपातप्रकरणी सुनील तटकरेंची चौकशी करा, तो राक्षसी माणूस, अंतुलेंनाही त्यांनीच संपवलं : रामदास कदम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई - रायगड जिल्ह्यात महायुतीत शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादी यांच्यातला वाद कमालीचा विकोपाला गेल्याचं चित्र आहे. या पुढचा अध्याय आता शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदमांनी सुरू केला. ऐन दिवाळीत रामदास कदमांनी आरोपांचा मोठा बॉम्ब फोडला आहे. यावेळी रामदास कदमांनी सुनील तटकरेंचा संबंध थेट अजित पवारांच्या अपघाती मृत्यूशी जोडण्याचा प्रयत्न केला. अजित पवारांच्या घातपातप्रकरणी सुनील तटकरे यांची चौकशी करा अशी मागणी रामदास कदमांनी केलीय.

सुनील तटकरे यांच्या महत्त्वाकांक्षा फार राक्षसी आहेत, त्या साध्य करण्यासाठी ते काहीही करू शकतात असं रामदास कदम यांनी म्हटलं. तसंच सुनील तटकरे यांना उपमुख्यमंत्री व्हायचं होतं असंही कानावर आल्याचं कदम यांनी म्हटलं. सुनील तटकरे यांच्यावर टीका करताना रामदास कदम म्हणाले की, 'हा अंतुले साहेबांचा पीए होतो, अंतुले साहेबांना यानेच संपवलं.



शहानूर मध्यम प्रकल्प परिसरात रब्बी हंगामासाठी पाणी सोडणे अशक्य

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



अमरावती – शहानूर मध्यम प्रकल्पामध्ये यंदाच्या रब्बी हंगामासाठी पाणी सोडणे अशक्य असल्याचे जलसंपदा विभागाच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. यावर्षी पडलेला अपुरा पाऊस आणि अल-निनो तसेच आयओडी (इंडियन ओशीयन डायपोल) च्या प्रभावामुळे धरणातील उपयुक्त पाणीसाठा घटला आहे. शहानूर धरण क्षेत्रात पाणीसाठा शिल्लक नसल्यामुळे यंदा रब्बी हंगाम २०२६-२७ राबविणे शक्य होणार नसून उपलब्ध पाणी केवळ पिण्यासाठी आरक्षित ठेवण्यात आल्याचे अचलपूर मध्यम व लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.गु.उमप यांनी कळिवले आहे.

अचलपूर मध्यम व लघुपाटबंधारे विभागाने जाहीर प्रकटनानुसार शहानूर धरणाची सद्यस्थिती आणि पाणी नियोजनाची माहिती कळिवली आहे. त्यानुसार ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत धरणात एकूण ३४.०९ दश लक्ष घनमिटर (दलघमी) म्हणजेच ७४.०५ टक्के उपयुक्त पाणीसाठा असून वार्षिक सरासरी बाष्पीभवनाप्रमाणे यातील ५.५० दलघमी वीज निर्मितीसाठी व पाणीसाठा कमी होणार आहे. धरण परीक्षेत्रातील नगरपरिषदा, ग्रामपंचायती आणि शासनाच्या अन्य पाणीपुरवठा योजनांसाठी २३.२८ दलघमी पिण्याचे पाणी आरक्षित करण्यात आले आहे. तर शासकीय निर्णयाच्या अधीन राहून ३.५० दलघमी म्हणजेच १० टक्के पाणी हे आकस्मीक राखीव साठा म्हणून ठेवण्यात आले आहे. गुरे-जनावरांसाठी १.७५ म्हणजेच ५ टक्के पाण्याचा राखीव साठा ठेवण्यात आला असल्याने शेतीच्या रब्बी हंगामासाठी धरणात पाणी शिल्लक नसल्याचे अचलपूर मध्यम व लघुपाटबंधारे विभागाद्वारे कळिवण्यात आले आहे.

शासकीय आदेशानुसार, भविष्यात प्रत्यक्षात पाऊस पडून धरणात उपलब्ध होणाऱ्या पाणी साठयातून प्रथम पिण्यासाठी, औद्योगिक वापरासाठी पाणी आरक्षित करण्यात येणार आहे. त्यानंतर उपलब्धता लक्षात घेऊन सिंचनासाठी पाणी सोडण्यात येईल.जलसंपदा विभागाने पाणी वापर संस्था, लाभधारक आणि नागरिकांना पाणी सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. पाणी ही राष्ट्रीय संपत्ती समजून प्रत्येकाने त्याचा अत्यंत काटकसरीने वापर करावा, धरणातून किंवा कालव्यातून पाण्याचा अनधिकृत वापर केल्यास 'महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६' मधील तरतुदींनुसार कडक कायदेशीर कारवाई केली जाईल,पाणी पुरवठ्याबाबत कोणत्याही प्रकारची जीवितहानी किंवा वित्तहानी होणार नाही, यासाठी नागरिकांनी सतर्क राहावे, असे कळिवण्यात आले आहे.

अरे व्वा! गावकऱ्यांना दिला दिवाळी बोनस : साताऱ्यातील मान्याचीवाडी ग्रामपंचायतीचा कौतुकास्पद उपक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



कराड – ग्रामविकासात लोकसहभागाचा आदर्श निर्माण करणाऱ्या पाटण तालुक्यातील मान्याचीवाडी ग्रामपंचायतीने गावकऱ्यांना दिवाळी बोनस देत त्यांची दिवाळी गोड केली आहे. ग्रामपंचायतीच्या या अनोख्या उपक्रमामुळे ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सुमारे पाचशे लोकसंख्या असलेली मान्याचीवाडी ग्रामपंचायत ग्रामविकासाचे अभ्यासकेंद्र म्हणून ओळखली जाते. गेल्या २४ वर्षांपासून ग्रामस्थांनी एकजुटीने लोकसहभागाची चळवळ उभी केली असून, त्यातून गावाच्या विकासाला नवी दिशा मिळाली आहे. ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत यांच्यातील विश्वासाचे नातेही या गावाच्या विकासाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले आहे.

ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे स्थापनेपासून सलग २५ वर्षे घरपट्टी, पाणीपट्टी आणि इतर कर आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी म्हणजे १ एप्रिल रोजी जमा होतात. राष्ट्रीय आणि राज्य शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवून ग्रामपंचायतीने आतापर्यंत तब्बल ८३ पुरस्कार मिळवले आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीने २०२४ मध्ये स्वतःची एक योजना आखून त्यासाठी ठरावीक रक्कम जमा केली. या रकमेवर दरवर्षी मिळणाऱ्या व्याजातून जमा होणारी अतिरिक्त रक्कम ग्रामस्थांच्या हितासाठी वापरण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार घरपट्टी, पाणीपट्टी आणि इतर करांची रक्कम वजा करून उर्वरित रक्कम संबंधित खातेदारांना रोख स्वरूपात दिवाळी बोनस म्हणून देण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य उत्तमराव माने, दिलीप गुंजाळकर, सीमा माने, लता आसळकर, निर्मला पाचपुते, दूध संस्थेचे अध्यक्ष अशोक माने, उपाध्यक्ष अशोक पाचपुते, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष दादासाहेब माने, पोलीस पाटील विकास माने, अधिकराव माने आणि ग्रामपंचायत अधिकारी अनिल चव्हाण आदी उपस्थित होते.

गोकुळ दूध संघातील सत्तांतराच्या कथित बेकायदेशीर प्रयत्नांना विरोध

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मोर्शी – कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत दूध उत्पादकांनी दिलेला लोकशाही कौल डावलून शासननियुक्त सदस्यांच्या माध्यमातून सत्तेचे गणित बदलण्याचे कथित बेकायदेशीर प्रयत्न रोखण्यात यावेत, अशी मागणी मोर्शी शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव विपुल भडांगे यांच्या नेतृत्वाखाली नायब तहसीलदार विनोद वानखडे यांना निवेदन सादर करण्यात आले.

गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत काँग्रेसचे नेते आमदार सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने २५ संचालकांच्या निवडणुकीत १३ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळिवले होते. तर सत्ताधारी महायुतीच्या पॅनेलला १२ जागांवर समाधान मानावे लागले होते. दूध उत्पादक मतदारांनी समविचारी आघाडीच्या बाजूने कौल दिलेला असतानाही महायुती सरकारकडून शासननियुक्त सदस्यांच्या माध्यमातून सत्तेचे गणित बदलण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.

निवडणुकीत लोकशाही मार्गाने विजयी झालेल्या आमदार सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्या नेतृत्वाखालील पॅनेलला सत्तेपासून वंचित ठेवण्याचे प्रयत्न हे सहकार क्षेत्रातील लोकशाही मूल्यांना बाधा आणणारे असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. अशा प्रकारचे निर्णय घेणे म्हणजे लोकशाही व्यवस्थेला कमकुवत करण्यासारखे असून, शासनाने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करावा. निवडणुकीत बहुमत मिळिवलेल्या समविचारी आघाडीला सत्तास्थापनेची संधी देऊन दूध उत्पादक शेतकऱ्यांचे अधिकार आणि सहकार क्षेत्रातील लोकशाही मूल्ये अबाधित ठेवावीत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

मोर्शी शहर काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन



यावेळी विपुल भडांगे (सचिव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी सेल), भूषण कोकाटे (अध्यक्ष, मोर्शी शहर काँग्रेस कमिटी तथा नगरसेवक, नगरपरिषद मोर्शी), जावेद पठाण, सय्यद साबीर सय्यद जाबीर, आशिष कडू, राजेंद्र लाखोडे, सय्यद शकील, विक्रम धोटे, पंकज वाघमारे, यश पांडे, सौरभ गाडे यांच्यासह अनेक काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

कुडाळ एमआयडीसीसाठी १० कोटींचा निधी मंजूर : दर गुरुवारी वरिष्ठ अधिकाऱ्याची उपस्थिती, ३३ केव्ही क्षमतेची उपकेंद्रे उभारणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



कुडाळ – गेल्या पाच दशकांपासून विविध पायाभूत आणि प्रशासकीय समस्यांचा सामना करणाऱ्या कुडाळ औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. उद्योजकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी दर गुरुवारी कुडाळ येथे उपस्थित राहणार असून, अंतर्गत विद्युत यंत्रणा आणि केबलिंगच्या कामांसाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी या महत्त्वपूर्ण निर्णयांची घोषणा केली.

१९७५ मध्ये स्थापन झालेल्या कुडाळ एमआयडीसीमध्ये अपेक्षित पायाभूत सुविधा, वीजपुरवठा, विविध परवानग्या आणि प्रशासकीय अडचणींमुळे औद्योगिक विकासाला पुरेशी गती मिळालेली नाही. अनेक कामांसाठी उद्योजकांना रत्नागिरी येथील कार्यालयात जावे लागत होते.

'ई-फेरफार'द्वारे होणार आता पीक पाहणी

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – तांत्रिक व भौगोलिक अडचणींमुळे खरिपाची ऑनलाइन पीक नोंदणी जिथे शक्य होत नाही, तिथे आता 'ई-फेरफार'द्वारे पीक पाहणी करण्याचा निर्णय फडणवीस सरकारने घेतला आहे. राज्यातील लाखो शेतकऱ्यांना यामुळे दिलासा मिळाला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निर्णयासाठी आग्रही भूमिका घेतली होती. महसूल विभागाने याबाबतचे परिपत्रक जारी केले. केंद्राच्या 'डिजिटल क्रॉप सर्व्हे' मोबाईल ॲपमध्ये शेतातील गटांचे अंतर अधिक दर्शवणे, गावांचे नकाशे परस्पर बदलणे, गट क्रमांक उपलब्ध नसणे यांसारख्या तांत्रिक अडचणी येत आहेत. तांत्रिक व भौगोलिक अडचणींमुळे खरिपाची ऑनलाइन पीक नोंदणी जिथे शक्य होत नाही, तिथे आता 'ई-फेरफार'द्वारे पीक पाहणी करण्याचा निर्णय फडणवीस सरकारने घेतला आहे.

दिवाळीत जवानांच्या स्मृतींना उजाळा

'एक दिया जवानों के नाम' उपक्रम उत्साहात!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मोर्शी – दिवाळीचा सण संपूर्ण देशात उत्साहात साजरा होत असताना देशाच्या रक्षणासाठी आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या जवानांच्या शौर्याचा आणि देशसेवेचा विसर पडू नये, तसेच त्यांच्या कार्याची प्रेरणा नव्या पिढीला मिळावी, या उदात्त हेतूने मोर्शी तालुक्यातील येरला येथे 'एक दिया जवानों के नाम' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सुविख्यात वैद्य डॉग ट्रेनिंग सेंटरचे संचालक तथा सेवानिवृत्त नायक सुभेदार गणेशराव वैद्य यांच्या संकल्पनेतून व नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. येरला गावचे सुपुत्र स्वर्गीय कॅप्टन हरिभाऊ भोगे यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी गावाच्या प्रवेशद्वारावर दीपावलीच्या पूर्वसंध्येला दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी स्वर्गीय कॅप्टन हरिभाऊ भोगे यांच्यासह त्यांच्या समवेत देशसेवेचे कर्तव्य बजावलेल्या सर्व जवानांच्या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. देशाच्या संरक्षणासाठी जवानांनी दिलेले योगदान सदैव स्मरणात राहावे आणि त्यांच्या त्यागातून तरुण पिढीने देशभक्तीची प्रेरणा घ्यावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. याप्रसंगी येरला येथील सेवानिवृत्त नायक सुभेदार गणेशराव वैद्य, सेवानिवृत्त हवालदार नंदकिशोर कळसकर, वारसा संघटनेचे सक्रिय सभासद प्रशांत चारे यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दिवाळीच्या प्रकाशपर्वात देशासाठी बलिदान देणाऱ्या व सेवा बजावणाऱ्या जवानांच्या स्मृतींना अभिवादन करणारा हा उपक्रम ग्रामस्थांसाठी प्रेरणादायी ठरला.

दिवाळीनिमित्त मोर्शी एसटी आगारातून विविध मार्गांवर जादा बसफेऱ्या

प्रवाशांनी एसटीच्या अतिरिक्त बससेवेचा लाभ घ्यावा : आगार व्यवस्थापक योगेश ठाकरे यांचे आवाहन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मोर्शी – दिवाळी सणानिमित्त प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) मोर्शी आगाराने प्रवाशांच्या सोयीसाठी विविध मार्गांवर जादा बसफेऱ्या सुरू करण्याचे नियोजन केले आहे. या अतिरिक्त बससेवेचा जास्तीत जास्त प्रवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मोर्शी आगाराचे आगार व्यवस्थापक योगेश ठाकरे यांनी केले आहे.

दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये नोकरदार, विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने आपल्या गावी आणि नातेवाइकांकडे जाण्यासाठी प्रवास करतात. त्यामुळे बसस्थानकांवर प्रवाशांची गर्दी वाढते. नियमित बसफेऱ्यांवर अतिरिक्त ताण येऊ नये आणि प्रवाशांची गैरसोय टाळता यावी, यासाठी मोर्शी आगाराने विशेष नियोजन केले आहे.

मोर्शी आगारातून दररोज सकाळी ६.१५ वाजता मोर्शी-बुलढाणा, सकाळी ६.१५ वाजता मोर्शी-नागपूर तसेच दुपारी १.३० वाजता मोर्शी-माहूर या नियमित बसफेऱ्या सुरू आहेत. याशिवाय गर्दीचा हंगाम लक्षात घेऊन शेगाव, यवतमाळ, अकोला, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे या प्रमुख मार्गांवर जादा बसफेऱ्या सोडण्यात येत आहेत. प्रवाशांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित व्हावा, यासाठी आगारात स्वच्छता तसेच आवश्यक सोयी-सुविधांची तयारी करण्यात आली आहे. प्रवाशांनी अवैध व खासगी वाहनांमधून धोकादायक प्रवास करण्याऐवजी एसटीच्या सुरक्षित बससेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही आगार प्रशासनाने केले आहे.

दरम्यान, महिला प्रवाशांना एनसीएमसी (NCMC) कार्ड काढण्याबाबत ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत शिथिलता देण्यात आली आहे. त्यामुळे सर्व महिला प्रवाशांनी दिलेल्या मुदतीत एनसीएमसी कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

बसफेऱ्यांचे वेळापत्रक, आरक्षण व इतर माहितीसाठी प्रवाशांनी मोर्शी बसस्थानकातील चौकशी कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन आगार व्यवस्थापक योगेश ठाकरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

संपादकीय

चांगले विचार आणि चांगली माणसे आयुष्य सुंदर बनवतात.

महाराष्ट्राचे राजकारण हिंदोळ्यावर : मुत्सद्देगिरीची कसोटी!

महाराष्ट्राचे राजकारण सध्या एका विचित्र वळणावर येऊन ठेपले आहे. सत्तेची समीकरणे, पक्षांतर्गत मतभेद, नेत्यांची बदलती भूमिका आणि राजकीय स्वार्थ यामुळे राज्यातील राजकीय वातावरण कमालीचे अस्थिर झाले आहे. कोण कोणाच्या बाजूने आहे आणि कोण कोणापासून दूर जात आहे, याचा अंदाज बांधणेही राजकीय निरीक्षकांसाठी कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्राच्या राजकारणाचा हिंदोळा नेमका कोणत्या दिशेने जाणार, हा प्रश्न सर्वसामान्य जनतेसमोर उभा आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक दशके प्रभावी भूमिका बजावणारे शरद पवार हे नाव केवळ एका राजकीय पक्षापुरते मर्यादित नाही. राजकीय डावपेच, परिस्थितीनुसार निर्णय घेण्याची क्षमता, विविध पक्षांतील नेत्यांशी संवाद आणि गुंतागुंतीची राजकीय समीकरणे सोडविण्याची हातोटी यामुळे त्यांनी देशाच्या राजकारणात स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. म्हणूनच त्यांना महाराष्ट्राच्या राजकारणातील मुत्सद्दी नेतृत्व म्हणून ओळखले जाते. मात्र काळ बदलला आहे, राजकीय परिस्थिती बदलली आहे आणि राजकारणातील पूर्वीची समीकरणेही आता तशी राहिलेली नाहीत.

आज शरद पवार यांच्यासमोर सर्वांत मोठे आव्हान आहे ते राजकीय प्रभाव टिकवून ठेवण्याचे. पक्षातील फूट, नेतृत्वासमोरील प्रश्न, बदलती राजकीय निष्ठा आणि कार्यकर्त्यांमधील संभ्रम या बाबींमुळे त्यांच्या राजकीय वाटचालीला मर्यादा निर्माण झाल्या आहेत. राजकीय अनुभव कितीही मोठा असला, तरी प्रत्येक वेळी परिस्थिती आपल्या नियंत्रणात राहीलच असे नाही. मुत्सद्देगिरीला मर्यादा असतात आणि त्या मर्यादा आजच्या राजकीय परिस्थितीत प्रकर्षाने जाणवत आहेत. महाराष्ट्रातील राजकीय पक्षांनी सत्तेसाठी केलेल्या तडजोडी आणि बदलत्या आघाड्यांमुळे राजकारणातील विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कार्यकर्ते एका विचारधारेवर काम करतात; मात्र नेतृत्वाच्या निर्णयांमुळे त्यांच्यासमोर वेगळीच परिस्थिती निर्माण होते. परिणामी सामान्य कार्यकर्त्यांचा उत्साह कमी होतो आणि मतदारांमध्येही संभ्रम निर्माण होतो. राजकारण हे केवळ सत्तेचे गणित नसून जनतेच्या विश्वासाचे माध्यम आहे, याचा विसर पडता कामा नये. या साऱ्या घडामोडींमध्ये राजकीय फायदा कोणाला होणार, यापेक्षा राज्याचे नुकसान किती होणार, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. शेतकरी, बेरोजगार युवक, महिला, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक यांचे प्रश्न आजही कायम आहेत. शेतीमालाला योग्य भाव, रोजगाराच्या संधी, महागाई, सिंचन आणि ग्रामीण विकास यांसारख्या प्रश्नांवर राजकीय पक्षांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे. मात्र राजकीय कुरघोड्यांमध्ये जनतेच्या प्रश्नांना दुय्यम स्थान मिळत असेल, तर ही लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे.



बिरसा मुंडा : क्रांतिकारी योध्दा

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर रोजी 'जनजातीय गौरव दिवस' म्हणून साजरा केला जात आहे. तसेच भगवान बिरसा मुंडा गौरव दिवस सेवा सप्ताहानिमित्त ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राज्यभर विविध जनकल्याणकारी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर क्रांतिकारी लढवय्या भगवान बिरसा मुंडा यांचे जीवनकार्य आणि त्यांच्या इतिहासातील कार्याविषयीची ही माहिती

देशभरातील जनतेमध्ये आणि आदिवासींमध्ये भगवान म्हणून बिरसा मुंडा यांची पूजा केली जाते. आदिवासी विकास आणि आदिवासींच्या हक्कांसाठी लढणारे लढवय्ये म्हणून त्यांना आपण सर्वजण ओळखतो. त्यांनी अल्प कालावधीत केलेल्या देशसेवा आणि अत्यंत उल्लेखनीय योगदानाबद्दल ते देशवासियांच्या कायम स्मरणात आहेत.

बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंड राज्यातील तत्कालीन रांची आणि आजच्या खुंटी जिल्ह्यातील उलिहातू गावात आदिवासी कुटुंबात झाला. बिरसांच्या वडिलांचे नाव सुगना मुंडा आणि आईचे नाव कर्मी मुंडा होते. बिरसा मुंडा यांचे प्राथमिक शिक्षण मिशनरी शाळेत झाले. त्या काळात इंग्रजांकडून भारतीयांवर अत्याचार करण्यात येत होते. हे पाहून त्यांनी शालेय जीवनापासून इंग्रज सरकार विरोधात लढा उभारण्याचा निश्चय केला.

हक्कासाठी क्रांतिकारक लढा

वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी, सध्याच्या झारखंडमधील उलिहातू गावातील बिरसा, हा तरूण मुलगा वसाहतवादी शोषणाविरुद्ध मोठ्या प्रमाणात प्रतिकार करणारा नायक बनला. जेव्हा ब्रिटीश अधिकारी आणि स्थानिक जमीनदार शोषण करीत होते, त्यांच्या जमिनी बळकावत होते आणि आदिवासी समुदायांवर अत्याचार करीत होते, तेव्हा भगवान बिरसा यांनी या सामाजिक आणि आर्थिक अन्यायाविरुद्ध आवाज उठविला आणि लोकांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी प्रेरित केले. 'धरती आबा' म्हणून आदरणीय असलेल्या भगवान बिरसा यांनी १८९० च्या दशकाच्या उत्तरार्धात ब्रिटीश दडपशाहीविरुद्ध 'उलगुलान' किंवा मुंडा बंडाचे नेतृत्व केले. इंग्रजांचा जनतेवरील अन्याय सहन न झाल्याने त्यांनी आयुष्यभर इंग्रजांविरोधात संघर्ष केला.

उलगुलान हा निःसंशयपणे बंडखोरीपेक्षा अधिक तीव्र होता. ही लढाई न्याय आणि सांस्कृतिक ओळख या दोन्हींसाठी होती. बिरसा मुंडा यांच्या पुढाकारामुळे एकीकडे आदिवासींना कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय त्यांच्या जमिनीवर मालकी मिळवण्याचा आणि शेती करण्याचा अधिकार मिळाला आणि दुसरीकडे आदिवासी चालीरीती आणि सामाजिक मूल्यांचे महत्त्व देखील एकत्र आणले. महात्मा गांधींप्रमाणेच त्यांचा संघर्षही न्याय आणि सत्याच्या शोधातून प्रेरित होता.

आजारी लोकांची सेवा करणे हे बिरसा यांचे ध्येय होते. त्यांनी औषधोपचार करण्याचे प्रशिक्षण घेतले होते. यशस्वी उपचाराच्या अनेक घटनांनी लोकांमध्ये विश्वास निर्माण झाला होता. त्यांनी लोकांना विनंती केली की, कोणत्याही आजारी व्यक्तीला त्यांच्याकडे घेऊन या, जर हे शक्य नसेल तर मी स्वतः आजारी लोकांना भेटायला येईन. ते गावोगावी जाऊन आजारी लोकांना भेटत असत आणि आपल्या कौशल्याने आणि आपल्या उपचाराने असंख्य लोकांना बरे करीत असत. दुष्काळ आणि महामारी आल्यानंतर जनतेचे प्रचंड हाल झाले. अशा काळात बिरसा मुंडा यांनी जनतेची खूप सेवा केली.

दोन वर्षे तुरुंगवास

एकीकडे जनतेचे हाल होत होते, दुसरीकडे इंग्रजांचा जुलूम अशा स्थितीत बिरसा यांनी जनतेवरील कर माफीसाठी इंग्रजांविरुद्ध थेट आंदोलन सुरू केले. बिरसांची वाढती लोकप्रियता इंग्रजाच्या डोळ्यात खुपत होती. त्यांनी दडपशाहीचा वापर करून १८९५ मध्ये बिरसा मुंडा यांना अटक करून हजारीबाग तुरुंगात पाठवले. बिरसा मुंडा येथील तुरुंगात सुमारे दोन वर्षे बंदिस्त राहिले. पुढे १८९७ ते १९०० या काळात ब्रिटिश आणि मुंडा यांच्यात अनेक वेळा युद्धे झाली.

बिरसा मुंडा आणि इंग्रज यांच्यात खुंटी येथे ऑगस्ट १८९७ मध्ये युद्ध झाले, बिरसा मुंडा आणि त्यांच्या सुमारे ४०० सहकाऱ्यांनी अत्यंत धैर्य दाखवित धनुष्यबाणांसह खुंटी पोलीस स्टेशनवर हल्ला केला. १८९८ मध्ये टांगा नदीच्या काठावर मुंडांसह त्यांचे सहकारी आणि इंग्रज यांच्यात प्रचंड संघर्ष झाला. या लढाईत इंग्रज सैन्याचा मानहानीकारक



पराभव झाला. परंतु इंग्रजांनी वचपा काढण्याकरिता अनेक आदिवासी नेत्यांना अटक करीत कारवाई करण्यास सुरुवात केली. यानंतर १९०० साली डोंबाडी टेकडीवर दुसरे युद्ध झाले. या लढ्यात अनेक महिलांसह निष्पाप अशा लहान मुलांचा मृत्यू झाला.

रांचीमध्ये घेतला अखेरचा श्वास

बिरसा मुंडा यांनी युद्ध करून इंग्रजांना जेरीस आणले होते. त्यामुळे फेब्रुवारी १९०० मध्ये इंग्रजांनी बिरसा मुंडा यांना चक्रधरपूर येथून अटक करून रांची तुरुंगात डांबले. येथेच ९ जून १९०० रोजी बिरसा मुंडा यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांचा मृत्यू कॉलरामुळे झाल्याचे इंग्रज सरकारने सांगितले. मात्र, त्यावेळी कॉलराची कोणतीही लक्षणे दिसली नसल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. वयाच्या २५ व्या वर्षी मुंडा यांचा मृत्यू झाला.

भगवान बिरसा मुंडा यांनी दाखवलेल्या मार्गावर चालणाऱ्याला 'बिरसाईच' म्हणतात. आजही त्यांचे अनुयायी त्यांनी सांगितलेल्या विचारधारेप्रमाणे चालतात. बिरसा मुंडा यांनी संपूर्ण जीवन आदिवासी समाजाच्या विकासाकरीता वाहून घेतले होते. अत्याचाराविरोधात आक्रमकपणे लढा देताना त्यांनी इंग्रजांच्या अत्याचाराविरुद्ध बिगुल फुंकले. बिरसा मुंडा हे पुरोगामी विचारवंत आणि सुधारणावादी नेते होते. त्यांनी आदिवासी समाजाला अंधश्रद्धा आणि अंमली पदार्थांच्या व्यसनाच्या विरोधात जागरूक केले. प्राण्यांना मारणे योग्य नाही, त्यांचा बळी देणे चुकीचे आहे, असे त्यांचे मत होते. पशू-पक्षी यांच्याबाबत सहानुभूती असली पाहिजे, असे सांगून त्यांनी आदिवासींना दारू पिण्यास विरोध केला. बिरसा मुंडा यांनी समस्त आदिवासींचे संघटन करण्यावर भर दिला.

झारखंड व्यतिरिक्त बिहार, ओडिशा, छत्तीसगड आणि पश्चिम बंगालच्या आदिवासी भागातही बिरसा मुंडा यांची पूजा केली जाते. रांची येथील कोकर येथे बिरसा मुंडा यांची समाधी आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने 'बिरसाईच' लोक, अनुयायी त्यांना आदरांजली वाहण्यासाठी तिथे जातात.

गौरव दिवस होणार साजरा

भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या जल, जंगल, जमीन आणि पारंपरिक हक्कांच्या संरक्षणासाठी केलेल्या संघर्षाचे स्मरण करण्यासाठी केंद्र शासनाने १५ नोव्हेंबर हा दिवस 'जनजातीय गौरव दिन' म्हणून घोषित केला आहे. आदिवासी स्वातंत्र्यवीरांचे योगदान, संस्कृती, परंपरा, इतिहास, भाषा आणि अस्मिता यांचे जतन व संवर्धन करून हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

बिरसा मुंडा यांच्या वारशाचे स्मरण करण्याचे उद्दिष्ट दीर्घकाळ दुर्लक्षित असलेल्या आदिवासी इतिहासाला भारताच्या इतिहासाच्या केंद्रस्थानी ठेवणे हे आहे. आदिवासी समाजाच्या अमूल्य योगदानाची ओळख होण्यासाठी हा दिवस देशभरात साजरा केला जातो. आदिवासी समाजाने क्रांतिकारी चळवळीतून इंग्रजाशी संघर्ष करताना सर्वोच्च बलिदान दिले. इंग्रजांच्या राजवटीविरुद्ध देशातील अनेक आदिवासी चळवळी राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यात सामील झाल्या होत्या. त्यांनी देशभरातील भारतीयांना प्रेरित केले आहे.

राज्यभर विशेष कार्यक्रम

भगवान बिरसा मुंडा गौरव दिवस सेवा सप्ताहानिमित्त ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राज्यभर विविध जनकल्याणकारी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या सप्ताहाच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देणे, विविध शासकीय सेवांचा लाभ सुलभ करणे तसेच त्यांचे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि आरोग्यविषयक सक्षमीकरण करण्यावर तसेच पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचे लाभ, सेवा वितरणावर विशेष भर देण्यात येणार आहे.

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर २०२६ रोजी महाराष्ट्रातील गडचिरोली येथे देशस्तरावरील मुख्य शासकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमास राज्यपाल, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, आदिवासी विकास मंत्री यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यानिमित्त राज्यातील सर्व जिल्हा आणि अनुसूचित जमातीबहुल तालुका मुख्यालयांमध्ये भगवान बिरसा मुंडा तसेच अन्य आदिवासी महापुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात येणार आहे. पद्म पुरस्कारप्राप्त आदिवासी व्यक्ती, सामाजिक नायक, समाजसेवक, बुद्धिजीवी, आदिवासी संत-महंत तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व समूहांचा सन्मान करण्यात येणार आहे. आदिवासी महापुरुषांच्या नावाने उद्याने, चौक आणि रस्त्यांचे नामकरण तसेच ऐतिहासिक वारशाच्या जतनाचे उपक्रमही राबविण्यात येतील.

इतिहासातील भगवान बिरसा मुंडा आणि इतर अशा काही व्यक्तिमत्वांची नावे माहित नसायची. अलीकडच्या काळात मातृभूमीसाठी त्यांच्या शौर्याचे आणि बलिदानाचे अधिकाधिक लोकांकडून कौतुक केले जात आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव काळात आपल्या संस्कृतीच्या आणि उपलब्धीच्या गौरवशाली इतिहासाची उजळणी साजरी केली गेली. यामुळे देशवासियांना, विशेषत: तरुण पिढीला, अशा महान देशभक्तांच्या शौर्यपूर्ण योगदानाची जाणीव झाली. त्यामुळे भगवान बिरसा मुंडा यांच्या शौर्य आणि पराक्रमी नेतृत्वाची आठवण आजच्या नवीन पिढीला सदैव प्रेरणा देत राहील यात शंका नाही.

अनिल आलुरकर
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
अमरावती (९४२३०७३४३०)

संसदेचा भातुकलीचा खेळ खेळणारे नेतृत्व

भारतीय मतदाराचा सूज्ञपणा लक्षात येण्याएवढा राहुल गांधी यांच्या आकलनाचा पैस व्यापक नाही. बिहारमधील अनेक मतदारांची नावे जाणीवपूर्वक वगळली गेली असा प्रचार राहुल गांधींनी पत्रकार परिषद घेऊन केला होता. मात्र तक्रार करण्यास बिहारमधील एकही मतदार न्यायालयापर्यंत गेला नाही.

देशाच्या राजधानीत राहुल गांधी हे दररोज आपल्या अकलेचे दिवाळे निघाल्याचे दररोज दाखवून देत आहेत. यासाठी ते मनोरंजनाचे प्रयोग दररोज सादर करत आहेत. १४० वर्षांची प्रदीर्घ परंपरा असलेल्या काँग्रेस पक्षाच्या अब्रूची लक्तरे आपण दररोज वेशीवर टांगत आहोत, हेही काँग्रेसच्या सध्याच्या नेतृत्वाला उमजेना झाले आहे. ज्या लोकशाहीसाठी काँग्रेसने ब्रिटिशांशी लढा दिला त्याच लोकशाहीचे राहुल गांधींकडून दररोज वस्त्रहरण होत आहे. यातील दुर्दैवाचा भाग म्हणजे काँग्रेस नेतृत्वाला चार उपदेशाचे बोल सुनावण्याचे धाडस एकही ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत दाखवत नाही.



याला अपवाद एकच, तो म्हणजे इंडियन एक्स्प्रेसचा स्तंभलेखिका तवलीन सिंह यांचा. गेल्या अडीच वर्षांत राहुल गांधींनी संसदेचे एकही अधिवेशन शांततेत पार पाडू दिलेले नाही. प्रत्येक अधिवेशनात सभात्याग करून, गोंधळ घालून राहुल गांधींनी आपल्याला लोकशाहीशी काहीच देणेघेणे नसल्याचे दाखवून दिले होते. संसदेचे कामकाज बंद पाडल्याशिवाय आपली आक्रमक विरोधी पक्षनेता अशी प्रतिमा जनतेच्या मनात ठसणार नाही, अशी समजूत करून घेऊन राहुल गांधी हे संसद कामकाज बंद पाडत आहेत. बाहेर मेळावे घेऊन, सभा घेऊन राजकीय पक्षांना आपले शक्तिप्रदर्शन जरूर करता येते. मात्र विविध विषयांवर, सरकारी विधेयकांवर आपली बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी विरोधकांनी संसद कामकाजात भाग घेणे अपेक्षित असते. लोकशाहीने विरोधकांना सरकारला कोंडीत पकडण्यासाठी विविध नियमांद्वारे आयुधे दिली आहेत. या आयुधांचा प्रभावी वापर करत एखाद्या विधेयकावर असलेले आक्षेप संसदेच्या व्यासपीठावर प्रभावीपणे मांडता येतात. संसदेतील चर्चा ही केवळ सरकारी उपचाराचा भाग नसते. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज फर्नांडिस, बॅ. नाथ पै, प्रा. मधु दंडवते, पिलू मोदी, मधु लिमये, चंद्रशेखर, सोमनाथ चटर्जी, सुषमा स्वराज यांसारख्या मंडळींनी विरोधी पक्षात असताना संसदेतील चर्चेद्वारे, संसदीय आयुधांच्या आधारे त्यावेळी सत्तेत असलेल्या प्रबळ काँग्रेस पक्षाला अनेकदा माघार घेणे भाग पाडले होते.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

...तर कर्मचाऱ्याचे निलंबन गृहित धरले जाईल : सर्वोच्च न्यायालय

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

नवी दिल्ली – जर एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याला अटक करून ४८ तासांपेक्षा अधिक काळ न्यायालयीन कोठडीत ठेवले गेले, तर त्याचे निलंबन गृहीत धरले जाते, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. न्या.जे.बी.पारडीवाला आणि न्या. मनमोहन यांच्या खंडपीठाने समस्तीपूर येथील सदर हॉस्पिटलचे प्रशासक



विश्वजित सिंग यांना मंजूर केलेला जामीन बहाल करताना हे महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. विश्वजित सिंग यांच्यावर एका कंत्राटी कामगाराची ३६,४२१ रुपयांची प्रलंबित वेतन रक्कम देण्यासाठी ४ हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप होता. सर्वोच्च न्यायालयाने पाटणा उच्च न्यायालयाचा आदेश बाजूला सारत सिंग यांचा जामीन बहाल केला, ज्यांनी सुमारे एक वर्षानंतर त्यांचा नियमित जामीन रद्द केला होता. खंडपीठाने स्पष्ट केले की, मागितलेली लाच रक्कम ही जामीन अर्ज फेटाळण्यासाठी सुसंगत बाब नसली तरी, उच्च न्यायालयाने जामीन रद्द न करताही ती टिप्पणी करू शकली असती.

सिंचन, पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नांवर तत्काळ कार्यवाही करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

नागपूर – दिवाळीनिमित्त ग्रामीण नागपूरच्या दौऱ्यावर असताना स्थानिक शेतकरी आणि सरपंचांशी संवाद साधल्यानंतर सिंचन, पिण्याचे पाणी तसेच पशुधनासाठी आवश्यक सुविधांबाबत राज्य सरकार तातडीने कार्यवाही करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दिली.



दरम्यान, लोहारी सावंगा गावातील एका शेतकऱ्याच्या घरी रात्रभर मुक्काम केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या कौतुकाबद्दल फडणवीस यांनी त्यांचे आभार मानले. पंतप्रधानांचे आचरण हे वंचित घटकांच्या सेवेसाठी आपल्याला नेहमीच प्रेरणा देत असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, 'मोदीजी समाजातील विविध घटकांशी, विशेषतः वंचित, शेतकरी आणि दिव्यांग व्यक्तींशी अत्यंत आपुलकीने संवाद साधतात. 'काल शेतकऱ्यांशी आणि आज सरपंचांशी झालेल्या चर्चेत पिण्याचे पाणी, सिंचन तसेच पशुधनासाठी पशुवैद्यकीय दवाखान्यांची उपलब्धता अशा अनेक समस्या समोर आल्या आहेत. या सर्व प्रश्नांवर राज्य सरकार तातडीने कार्यवाही करेल', अशी ग्वाही त्यांनी दिली. 'या भागातील पाण्याची तीव्र टंचाई फळबागांसाठी मोठा धोका ठरत आहे. अनेक वर्षांपासून वाढवलेली फळझाडे पाण्याअभावी वाळून गेली, तर नव्याने झाडे लावून त्यांना फळे येण्यास सात ते बारा वर्षांचा कालावधी लागू शकतो. त्यामुळे सध्या ही झाडे वाचविणे हे आमचे सर्वांत मोठे प्राधान्य आहे', असे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत जागृत इंग्लिश स्कूलचे घवघवीत यश

ओजस घ्यारला सुवर्णपदकासह राष्ट्रीय स्पर्धेसाठी संधी : खुशी धुगे हिला रौप्यपदक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद अकोला व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अकोला यांच्या वतीने दि.२ ते ४ नोव्हेंबर २०२६ दरम्यान आयोजित राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो क्रीडा स्पर्धा २०२६-२७ मध्ये जागृत इंग्लिश प्रायमरी अँड हायर प्रायमरी स्कूल वरुडच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



या स्पर्धेत शाळेचा विद्यार्थी ओजस महेंद्र घ्यार याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत सुवर्णपदक पटकावले. त्याच्या या दैदीप्यमान कामगिरीच्या जोरावर त्याची राष्ट्रीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे तसेच शाळेची विद्यार्थिनी खुशी कैलास धुगे हिनेही आपल्या उत्कृष्ट खेळाचे कौशल्य दाखवत रौप्यपदक मिळविले. दोन्ही विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर मिळविलेल्या या यशामुळे जागृत इंग्लिश स्कूल वरुडच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील लौकिकात भर पडली आहे. विद्यार्थ्यांचे हे यश त्यांच्या कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि क्रीडा कौशल्याचे फलित असल्याची भावना शाळेच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

या यशाबद्दल जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गिरीश गांधी, उपाध्यक्ष डॉ.मनोहर आंडे, सचिव संतोष क्षीरसागर, मुख्याध्यापिका पूजा मांडवगळे, पर्यवेक्षिका उज्वला लाडोळे, क्रीडा शिक्षक कृष्णा मिश्रा तसेच क्रीडाप्रेमींनी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

लोणी येथे प्रदूषणमुक्त दिवाळी व स्वच्छता अभियानाचा संकल्प!

विद्यार्थ्यांनी घेतली पर्यावरण संवर्धनाची सामूहिक शपथ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

लोणी – दिवाळीचा सण आनंद, उत्साह आणि प्रकाशाचा असला तरी या काळात होणारे वायू व ध्वनी प्रदूषण पर्यावरणासाठी हानिकारक ठरते. याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करुन पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश देण्यासाठी लोणी येथील अप्पर वर्धा प्रकल्पग्रस्त वेलफेअर सोसायटीद्वारा संचालित माध्यमिक विद्यालय व कला, वाणिज्य व व्यावसायिक अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने प्रदूषणमुक्त दिवाळीची सामूहिक शपथ घेण्यात आली.



या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी फटाक्यांचा वापर टाळून पर्यावरणपूरक पद्धतीने दिवाळी साजरी करण्याचा संकल्प केला. त्याचबरोबर महाविद्यालय परिसरात भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांसह विद्यार्थ्यांनी संपूर्ण महाविद्यालय परिसर, वर्गखोल्या तसेच क्रीडांगणाची स्वच्छता करुन स्वच्छतेचा संदेश दिला.

या उपक्रमात मुख्याध्यापक तथा प्राचार्य, शिक्षकवृंद आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी एस.एम.दुधे, एन.व्ही.वडनेरकर, एन.एस.वडनेरकर, आर.डी.सोळंके, एस.डी.वंजारी, डी.एम.सावंत, एम.आर.भालेकर, एल.व्ही.चिंचे, के.आर.नेरकर, पी.डी.ब्राह्मणे, भावना पोहरकर, नम्रता पोहरकर, समीक्षा कुबडे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दिवाळी हा आनंदाचा सण असून तो साजरा करताना पर्यावरणाचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करुन ध्वनी व वायू प्रदूषणाला आळा घालावा तसेच परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत राबविलेल्या या उपक्रमाचे लोणी परिसरात कौतुक होत असून, पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेचा सकारात्मक संदेश या माध्यमातून देण्यात आला आहे.

पहिल्या रोपवेचा मार्ग मोकळा : नॅशनल पार्क, तुळशी तलावाचे निसर्गसौंदर्य अनुभवा; मुलुंडच्या रोपवेसाठी सल्लागाराची नियुक्ती लवकरच

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – मुंबईतील पहिल्या रोपवे प्रकल्पाच्या दिशेने राज्य सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. मुलुंड च्या डोंगरपायथ्यापासून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या (एसजीएनपी) हद्दीतील तारामती उभारण्यासाठी माता मंदिरापर्यंत प्रस्तावित रोपवे सविस्तर वास्तुरचनात्मक आराखडा तयार करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) सल्लागार नियुक्तीसाठी निविदा मागविल्या आहेत. दरम्यान, मुलुंडचे भाजप आमदार मिहिर कोटेचा यांनी यापूर्वी निवडणुकीदरम्यान या रोपवेची मागणी केली होती. परिसरातील पर्यटनाला चालना देण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे.



निविदा प्रक्रियेचे स्वागत करताना आमदार मिहिर कोटेचा म्हणाले, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मुलुंडच्या डोंगरपायथ्यापासून डोंगरमाथ्यावरील निसर्गरम्य परिसरात असलेल्या तारामती माता मंदिरापर्यंत रोपवे उभारण्याचे आश्वासन आम्ही दिले होते. पर्यटनाला चालना देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा आहे. या प्रकल्पाच्या वास्तुरचनात्मक आराखडा चासाठी पीडब्ल्यूडीने सल्लागार नियुक्तीची निविदा काढल्याचा आनंद आहे.

परवानग्या मिळाल्यानंतरच पुढील कार्यवाही

प्रस्तावित रोपवे मुलुंड ते बोरिवली असा व्यावसायिक स्वरूपाचा नसल्याचे कोटेचा यांनी स्पष्ट केले. हा रोपवे केवळ मुलुंड परिसरापुरताच मर्यादित असेल. मुलुंडच्या डोंगरपायथ्यापासून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीतील तारामती माता मंदिरापर्यंतच त्याची जोडणी असेल. बोरिवलीपर्यंत रोपवे जाणार असल्याच्या चर्चेत तथ्य नाही, असे त्यांनी सांगितले. प्रकल्पाचा सविस्तर आराखडा तयार झाल्यानंतर आणि केंद्र सरकारच्या वन व पर्यावरण विभागाच्या आवश्यक परवानग्या मिळाल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पी.एम.श्री जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक कन्या शाळा पुसला येथे

दिवाळी निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड – पी.एम.श्री जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक कन्या शाळा पुसला येथे दिवाळीनिमित्त वर्ग १ ते ७ च्या विद्यार्थ्यांचे वर्ग शिक्षकांनी विविध उपक्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना वाव मिळावा, त्यांच्या कलागुणांना चालना मिळावी, त्यांच्यातील कौशल्य विकसित व्हावे, या उददेशाने हा उपक्रम घेण्यात आला.



यासाठी वर्ग १ते ७ चे वर्गशिक्षक व वर्गशिक्षिका अरुणा कोहळे, सुषमा अंबाडकर, मीना वरखेडकर, जया बारमासे, मीना सोनकुसळे, चंद्रकांत धार्मिक, लता शिरसाठ, रंजना निंबुरकर, अर्चना जवादे, कविता खासबागे यांनी विविध उपक्रम शाळेत घेतले. आकाश दिवा तयार करणे, दिवे रंगविणे, मातीपासून किल्ला तयार करणे, प्लास्टिक मुक्त भारत यावर चित्र रेखाटन करणे, कापसापासून वाती तयार करणे, पानफुलांपासून डिझाईन तयार करणे, रांगोळी काढणे, कागदी दिवे तयार करणे असे अनेक उपक्रम घेण्यात आले.

सर्व साहित्याची पाहणी मुख्याध्यापक भगवंत गजभिये, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनील लोखंडे, पुसला केंद्राचे केंद्रप्रमुख भूपेश वानखेडे यांनी केली. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष गणेश वानखेडे, सदस्य यांनी सुद्धा विद्यार्थ्यांच्या साहित्याची पाहणी करुन कौतुक केले.

जलसुरक्षा व भूजल संवर्धनासाठी केंद्राचा विशेष प्रकल्प

गव्हाणकुंड येथे ग्रामपंचायतस्तरीय विचार-विनिमय बैठक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – भारत सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाच्या पुढाकाराने राष्ट्रीय जलभृत मानचित्रण २.० व ग्राम व्यवस्थापन योजना तसेच विकसित भारत – रोजगार आणि आजीविका हमी अभियान (ग्रामीण) अंतर्गत विकसित ग्रामपंचायत नियोजन यांच्या अभिसरणातून महाराष्ट्रातील सहा जलसंकटग्रस्त तालुक्यांमध्ये जलसुरक्षा व भूजल संवर्धनासाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येत आहे.





या प्रकल्पामध्ये महाराष्ट्रातील एकूण ६ तालुक्यांचा समावेश असून त्यामध्ये वरुड तालुक्याचाही समावेश आहे. या तालुक्यांमध्ये भूजल पातळीत वाढ करणे, पावसाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन, भूजल पुनर्भरण, शेतीसाठी सिंचन सुविधा तसेच पिण्याच्या पाण्याची शाश्वत उपलब्धता निर्माण करणे, हा प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे.

या अनुषंगाने ग्रामपंचायत गव्हाणकुंड येथे विशेष ग्रामपंचायतस्तरीय विचार-विनिमय बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीला केंद्रीय भूजल मंडळ नागपुरचे प्रादेशिक संचालक डॉ.उमेश बालपांडे, राज्य क्षमता बांधणी कक्षाचे सुमित गोरले, हरीश खासबागे, माजी सरपंच गीता राऊत, ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती व तहसील कार्यालय व कृषी विभागाचे अधिकारी, गावातील युवक, शेतकरी, महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

बैठकीदरम्यान गावातील पाणीटंचाई, भूजल उपलब्धता, सिंचनाच्या समस्या, पीक पद्धती आणि जलसंधारणाच्या उपाययोजनांबाबत ग्रामस्थांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. व्हिजीपीपी पोर्टलवरील ग्रामपंचायत नकाशा व विविध नकाशांच्या माध्यमातून गावाची भौगोलिक रचना, भूगर्भीय परिस्थिती, नैसर्गिक संसाधने आणि जलस्रोतांची माहिती सादर करण्यात आली.

त्यानंतर अधिकारी व तांत्रिक पथकाने ग्रामस्थांसोबत गावफेरी व शिवारफेरी करून उपलब्ध जलस्रोत, नैसर्गिक नाले, पाणीप्रवाह क्षेत्रे, भूजल पुनर्भरणाची संभाव्य ठिकाणे तसेच नव्याने प्रस्तावित कराव याच्या जलसंधारणाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली.

जलशक्ती मंत्रालयाच्या भूजलविषयक तांत्रिक माहितीचा वापर आणि विकसित ग्रामपंचायत नियोजन यांचा समन्वय साधून लोकसहभागातून जलसुरक्षित, रोजगारसमृद्ध व शाश्वत ग्रामविकास साध्य करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची दुष्काळग्रस्तांसाठी मोठी घोषणा

मुलींच्या लग्नाचा संपूर्ण खर्च आणि शिक्षणाची हमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – दिवाळीचा सण संपूर्ण महाराष्ट्रात उत्साहात साजरा होत असताना, दुसरीकडे दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक अत्यंत मोठा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. जालना येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी मदतीची घोषणा केली आहे, त्यांच्या या घोषणेची सर्वत्र चर्चा रंगली आहे. सणासुदीच्या काळात फराळ आणि शिधावाटपापुरते मर्यादित न राहता, थेट शेतकऱ्यांच्या दारात पोहोचून शिंदेंनी त्यांच्या सर्व अडीअडचणींची जबाबदारी स्वीकारली आहे. संकटकाळात हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना मोठा आधार देण्यासाठी शिवसेनेकडून मदत करण्यात येत आहे.

मुलींच्या लग्नाचा संपूर्ण खर्च आणि शिक्षणाची हमी जालना दौऱ्यादरम्यान अंबादास तांगडे या शेतकऱ्याच्या घरी भेट दिल्यावर एक अत्यंत भावनिक प्रसंग घडला. तांगडे यांच्या बारावीत शिकणाऱ्या मुलीने पोलीस अधिकारी होण्याचे स्वप्न व्यक्त केले, तेव्हा मुख्यमंत्री शिंदेंनी तात्काळ तिच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च उचलण्याचे निर्देश दिले. याशिवाय, दुष्काळामुळे ज्या शेतकरी कुटुंबांमधील मुलींची लग्ने रखडली आहेत, त्या सर्व मुलींच्या लग्नाचा संपूर्ण खर्च शिवसेना करणार असल्याची मोठी घोषणा त्यांनी केली. आर्थिक संकटात सापडलेल्या तांगडे कुटुंबाने दाखवलेली आपुलकी आणि दिलेली ज्वारी-बाजरीची भेट मनाला हेलावून टाकणारी होती, असे सांगत त्यांनी शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न केला.

५७४ उपाययोजना आणि कर्जमाफीवर महत्त्वाची चर्चा शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करून पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. ५७४ प्रस्तावित उपाययोजना आणि १६.७४ कोटींच्या निधीला प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन अनुदान आणि युनियन बँकेचे २८ कोटींचे कर्ज माफ करण्याच्या कामाचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. पीककर्जासह अल्प व दीर्घमुदतीच्या शेतीनिगडित कर्जमाफीच्या मागणीवर मंत्रिमंडळात सकारात्मक चर्चा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

सावकार आणि बँकांना सज्जड दम संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या बँका, मायक्रो फायनान्स कंपन्या आणि खासगी सावकारांवर कठोर कारवाईचा इशारा त्यांनी दिला. 'जिथे संकट तिथे शिवसेना' या भूमिकेतून पक्षाचे कार्यकर्ते काम करत असून शेतकऱ्यांनी कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नये, असे भावनिक आवाहन त्यांनी केले. लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही आणि २१०० रुपयांचा शब्द पाळला जाईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी दिला.

सरकारने गुलदस्त्यात ठेवलेली ४ नावं सतेज पाटलांनी कशी शोधून काढली?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

जीआर साईटवर अपलोड नसतानाही सिक्रेट माहिती लीक



मुंबई – गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील राजकारणाचा केंद्रबिंदू झालेल्या गोकुळच्या अध्यक्षपदाची निवडणूक मंगळवारी पार पडणार आहे. सकाळी ११ वाजता निवडणुकीत निवडून आलेले २५ संचालक आणि पाच शासननियुक्त संचालक यांच्या उपस्थितीत अध्यक्षपदाची निवडप्रक्रिया पार पडेल. महायुती सरकारने काही दिवसांपूर्वीच गोकुळवर पाच सरकारी संचालक नेमण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, राज्य सरकारने अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार असलेल्या या चार संचालकांची नावं गुलदस्त्यात ठेवली होती. ही नावं गुपित राहावीत, कोणाला कळू नयेत, यासाठी राज्य सरकारने सर्व खबरदारी घेतली होती. त्यासाठी राज्य सरकारने पाच नामनिर्देशित सदस्यांच्या नावाचा समावेश असलेला जीआर शासकीय संकेतस्थळावरही अपलोड केला नव्हता. मात्र, सतेज पाटील यांनी सोमवारी संघर्ष मोर्चाच्या व्यासपीठावर सर्वांदेखत महायुती सरकारच्या गुप्त जीआरमधील संचालकांची नावे जाहीर केली. शिवाजी दिनकर आडनाईक, डॉ.प्रवीणचंद्र रंगनाथ हेंद्रे, प्रशांत भगवान पाटोले आणि कृष्णात ज्ञानदेव पाटील अशी ही चार नावे आहेत. महायुती सरकारने इतकी गुप्तता आणि खबरदारी बाळगूनही आणि सरकारी जीआर कुठेही अपलोड नसताना ही चार नावं बंटी पाटील यांना कोणी दिली? सत्ताधारी एका पक्षातील नेत्यांकडून तर तो जीआर बंटी पाटलांपर्यंत पोहचला नसेल ना? अशी चर्चा संघर्ष मोर्चानंतर कोल्हापूरमध्ये रंगली होती. सतेज पाटील यांनीही आपल्या भाषणात याबाबत सूचक भाष्यही केले होते. दुग्धविकास विभागाने गोकुळसंदर्भात जीआर काढला.सकाळपासून माझी चार माणसं बसलेत, दर पाच मिनिटांनी इंटरनेट बघत आहेत, जीआर अपलोड नाही.

नवी मुंबईतील गोळीबारात दोन तरुणी जखमी, पुढील उपचारासाठी जे.जे. रुग्णालयात दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



नवी मुंबई – गेल्या आठवड्यामध्ये नवी मुंबईतील कोपर खैराणेमध्ये, दोन सख्ख्या बहि?णींवर अंदाधुंद गोळीबार झाल्याची घटना घडली होती. या घटनेमध्ये दोघीही बहि?णी जखमी झालेल्या होत्या. त्यापैकी एक तरूणी किरकोळ जखमी होती आणि एकीच्या पाठीमध्ये बंदुकीची गोळी अडकलेली होती. दरम्यान, गुरूवारी, ५ नोव्हेंबर २०२६ रोजी कोपरखैराणेतील सेक्टर १ मध्ये आरोपी अर्जुन चव्हाणने घराबाहेर बसलेल्या दोन्हीही बहिणींवर गोळीबार केल्यानंतर त्यांना लगेचच नवी मुंबई महानगर पालिकेच्या रुग्णालयामध्ये नेण्यात आलं. परंतु, रूग्णालयामध्ये पुरेशी वैद्यकीय यंत्रणा आणि महानगरपालिकेच्या रुग्णालयात न्यूरोसर्जन उपलब्ध नसल्यामुळे रूग्णालय प्रशासनाने भायखळ्याच्या जे.जे. रूग्णालयामध्ये शिफ्ट करण्यासाठी सांगितले. तिथेच आज त्यातील छोट्या बहिणीवर पाठीत अडकलेली गोळी काढण्यासाठी शस्त्रक्रिया करण्यात आली नवी मुंबई महानगर पालिकेच्या रूग्णालयातील फर्स्ट रेफरल युनिटचे राजेंद्र म्हात्रे प्रतिक्रिया देताना म्हणाले की, अंदाधुंद गोळीबार करताना २० वर्षीय तरूणीच्या पाठीला गोळी लागली.

'दिमागी नक्षल 'चा समाचार : हिंमत असेल तर चर्चेला या, राहुल यांचे पंतप्रधान मोदींना पुन्हा आव्हान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



नवी दिल्ली – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या 'दिमागी नक्षल' या टीकेचा समाचार घेत, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी मोदींना, देशद्रोही कोण आणि परकीय शक्तींच्या नियंत्रणाखाली कोण आहे, यावर समोरासमोर चर्चा करण्याचे पुन्हा एकदा आव्हान दिले आहे.

'सीआरपीएफ' जवानांना उद्देशून केलेल्या पोस्टमध्ये गांधी यांनी म्हटले आहे की, जवानांनी पंतप्रधानांच्या खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवलेला नाही. चर्चेनंतर कोणत्याही पंतप्रधानांचे जवानासमोर उभे राहण्याचे धाडस होणार नाही, असा दावा त्यांनी केला. मोदी यांनी रविवारी छत्तीसगडमधील बस्तर येथील कॅम्पमध्ये 'सीआरपीएफ' जवानांसोबत दिवाळी साजरी करताना म्हटले होते की, शस्त्रास्त्रे बाळगणाऱ्या माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. मात्र 'दिमागी नक्षल' अनेक राजकीय पक्ष आणि संस्थांमध्ये घुसले असून ते संविधानाविरुद्ध आणि लोकशाहीविरुद्ध लोकांना भडकावत आहेत. अशा घटकांना ओळखून त्यांचा पराभव करणे आणि देश सुरक्षित ठेवणे आवश्यक असल्याचे मोदी म्हणाले.

वर्सोवा कोळीवाड्यात मच्छीमार बांधवांसोबत मंत्री नितेश राणे यांची दिवाळी!

कुटुंबीयांना दिला मदतीचा विश्वास

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – महाराष्ट्राचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी वर्सोवा कोळीवाड्यात मच्छीमार बांधवांसोबत दिवाळी साजरी करत सणाचा आनंद द्विगुणित केला.

यावेळी त्यांनी मच्छीमार कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि कुटुंबीयांना मदतीचा विश्वास दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आयोजित या भेटीत मच्छीमार कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांच्या सुख-दुःखात सहभागी झाले. मंत्री नितेश राणे यांनी वर्सोवा कोळीवाड्यातील मच्छीमार कुटुंबीयांची भेट घेतली.

यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांच्या दैनंदिन अडचणी, व्यवसायातील समस्या आणि आर्थिक परिस्थिती जाणून घेतली.

वर्सोवा कोळीवाड्यातील मच्छीमार कुटुंबाच्या घरी मंत्री नितेश राणे यांनी भेट दिली. यावेळी मच्छीमार बांधवांच्या समस्या जाणून घेत त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दिवाळीच्या आनंददायी वातावरणात मंत्री नितेश राणे यांनी मच्छीमार कुटुंबीयांना दिवाळी फराळाचे वाटप केले.

रशिया-युक्रेन युद्धाचा तिढा सुटणार? पंतप्रधान मोदींच्या एका फोन कॉलने उडाली खळबळ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



नवी दिल्ली – रशिया आणि युक्रेनमधील भीषण युद्ध थांबवण्यासाठी आता आंतरराष्ट्रीय पातळीवर हालचालींना वेग आला आहे. यातच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि युक्रेनचे राष्ट्रपती वोलोडिमिर झेलेन्स्की यांच्यात सोमवारी एका उच्चस्तरीय फोन कॉलवर महत्त्वाची चर्चा झाली. अबुधाबी येथे रशिया आणि युक्रेन दरम्यान होणाऱ्या शांतता चर्चेच्या अगदी एक दिवस आधी हा संवाद झाल्यामुळे याला जागतिक राजकारणात मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

युद्धावर शांततापूर्ण तोडगा काढण्यास भारत कटिबद्ध चर्चेदरम्यान पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केले की, भारत मानवकेंद्रित दृष्टिकोनाला प्राधान्य देतो आणि संवाद व मुत्सद्देगिरीच्या माध्यमातूनच या संघर्षावर तोडगा निघू शकतो. रशिया-युक्रेन युद्धाचा अंत व्हावा आणि लवकरच शांती प्रस्थापित व्हावी, यासाठी भारत सर्वतोपरी सहकार्य करण्यास आणि योगदान देण्यास पूर्णपणे तयार असल्याचे मोदींनी पुनर्रच्चार केला.

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.१०३३/२०२६ **ने.ता.२१/१२/२०२६**

अर्जदार :-

१) वर्षा सुनिलराव वागद्रे, वय अं.४६ वर्ष, धंदा-घरकाम

२) निहारिका सुनिल वागद्रे, वय अं.१९ वर्ष, धंदा-शिक्षण

३) चिराग सुनिल वागद्रे, वय अं.१३ वर्ष, धंदा-शिक्षण

सर्व रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

(अर्जदार क्र.३ करीता अ.पा.क म्हणुन अर्जदार क्र.१ आई)

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत सुनिल आनंदराव वागद्रे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२१/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०७/११/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

मोर्शीत दिवाळीच्या सणात गवळण नृत्याची परंपरा आजही कायम!

पुरुष कलावंत स्त्री वेशभूषेत साकारतात गवळणीचे रूप

गोप-गोपिकांच्या शाहिरी गायनाने शहरात रंगतो सांस्कृतिक उत्सव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मोर्शी – मोर्शी शहरात दिवाळीच्या सणाला एक आगळीवेगळी आणि पारंपरिक सांस्कृतिक परंपरा लाभली आहे.

दिवाळीच्या पहिल्या दिवसाच्या रात्रीपासून सलग पाच दिवस शहरात गवळण काढण्याची परंपरा आजही मोठ्या उत्साहात जोपासली जात आहे. आधुनिकतेच्या काळातही मोर्शीकरांनी ही लोककला आणि सांस्कृतिक वारसा जपून ठेवला आहे.

या परंपरेत एका पुरुष कलावंताला स्त्री नर्तकीचा वेश परिधान करून गवळणीचे रूप दिले जाते. त्यानंतर गोप-गोपिकांच्या जीवनावर आधारित शाहिरी स्वरूपातील गायन आणि नृत्य सादर केले जाते. पारंपरिक वेशभूषा, तालबद्ध नृत्य आणि शाहिरी गीतांच्या माध्यमातून वातावरणात उत्साह निर्माण होतो. गवळण पथक घरोघरी जाऊन नृत्य सादर करते. यावेळी नागरिकांकडून कलावंतांना बक्षीस व प्रोत्साहन दिले जाते.

या पारंपरिक लोककलेमध्ये मोर्शीतील शाहीर राजेंद्र बोबडे, कलावंत मच्छिंद्र, शाहीर रावसाहेब, प्रज्वल गहूकर, सुरेंद्र बोबडे, अंकित जंजाळकर, सागर अरसडे, सूरज मालपे, रवी नरवरे, चक्रधर हिरडे आदी कलावंत उत्स्फूर्तपणे सहभागी होतात.

विशेष म्हणजे गाईगोधनाच्या दिवशी या परंपरेला अधिक महत्त्व असते. या दिवशी गुराढोरांची विधिवत पूजा करून त्यांची ओवाळणी केली जाते. शेती आणि पशुधनाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची ही परंपरा दिवाळीच्या आनंदात भर घालते.

मोर्शी शहरासह ग्रामीण भागातही गवळण नृत्याची परंपरा आजही टिकून आहे. नव्या पिढीतील कलावंतही या लोककलेत सहभागी होत असल्याने मोर्शीच्या सांस्कृतिक वैभवाचा हा अनमोल ठेवा पुढील पिढीपर्यंत पोहोचत आहे.

केवळ मनोरंजन नव्हे, तर लोककला, परंपरा आणि सामाजिक एकोपा जपणारा हा गवळण उत्सव मोर्शीच्या दिवाळीचे खास आकर्षण ठरत आहे.

सोने-चांदीचे दर

शुध्द सोने	९६१०८१० रु.(१०ग्रॅम)
२२.कॅ सोने	९४,७०० रु.(१०ग्रॅम)
चांदी	१,३०,००० रु. (प्र.किलो)

कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव (क्विंटलमध्ये)

ज्वारी	१६५०	२०००
गहू	२५००	३०००
तूर	६१००	६३९०
मूग	६५००	७०००
उडीद	६०००	७०००
हरभरा	५६००	५९००
सोयाबिन	४१००	४३५०
बाजरा	२०००	२३००
तिळ	८२००	९३००
भुईमूग	५१५०	५३५०
मका	२२००	२३००

बागा वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना मिळणार बोअरसाठी परवानगी!

आमदार उमेश चंदू यावलकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे केला होता पाठपुरावा



❝ * वरुड-मोर्शी विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या संत्रा व इतर फळबागा पाण्याअभावी अडचणीत येत असल्याची गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ड्रायझोनमधील शेतकऱ्यांना बोअरवेल करण्यासाठी विशेष परवानगी देण्याची मागणी केली होती. शेतकऱ्यांनी वर्षानुवर्षे कष्ट घेऊन उभ्या केलेल्या फळबागा केवळ पाण्याअभावी नष्ट होऊ नयेत, हीच या मागणी मागील प्रामाणिक भावना होती.

* मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नाची दखल घेऊन फळबागा वाचविण्यासाठी बोअरवेलवरील निर्बंध तात्पुरते शिथिल करण्याची घोषणा केली, ही निश्चितच समाधानाची बाब आहे. या निर्णयामुळे संकटात सापडलेल्या फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

* शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्याच्या कष्टाचे चीज झाले पाहिजे आणि त्याने उभ्या केलेल्या बागा जगल्या पाहिजेत, ही आपली भूमिका आहे. शासनाने घेतलेल्या या सकारात्मक निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.


* तसेच या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होऊन वरुड-मोर्शी मतदारसंघातील पात्र शेतकऱ्यांना विनाविलंब परवानगी मिळावी, अशी अपेक्षा आहे. शेतकऱ्यांच्या प्रत्येक अडचणीत त्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांचे प्रश्न शासनदरबारी मांडण्याचे काम यापुढेही सातत्याने सुरु राहील, अशी प्रतिक्रिया आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांनी व्यक्त केली. ❞

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड – निसर्गाच्या लहरीपणामुळे यंदा वरुड-मोर्शी विधानसभा मतदारसंघातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. अपुऱ्या पावसामुळे भूजल पातळीत मोठी घट झाली असून अनेक विहिरी आणि बोअरवेलची पाणीपातळी खालावली आहे. अशा परिस्थितीत संत्रा, मोसंबी यांसारख्या फळबागा जगविण्याचे मोठे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहे. आधीच ड्रायझोनच्या निर्बंधांमुळे नवीन बोअरवेल करण्यास अडचणी येत असताना फळबागा वाचविण्यासाठी विशेष सवलत देण्यात यावी, अशी मागणी मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. त्यांच्या या मागणीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी फळबागा असलेल्या दुष्काळग्रस्त भागांत बोअरवेलवरील निर्बंध तात्पुरते शिथिल करण्याची घोषणा केल्याने शेतकरी वर्गात समाधान व्यक्त होत आहे.

हजारो झाडांचे भवितव्य पाण्यावर अवलंबून!

वरुड आणि मोर्शी तालुका हा संत्रा उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. या परिसरातील अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक गणित संत्रा व मोसंबीच्या फळबागांवर अवलंबून आहे. शेतकऱ्यांनी अनेक वर्षे मेहनत, भांडवल आणि कष्ट घेऊन फुलविलेल्या या बागा सध्या पाण्याअभावी धोक्यात आल्या आहेत. पावसाने ओढ दिल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला असून विहिरींची पाणीपातळीही खालावली आहे. परिणामी फळझाडांना आवश्यक पाणी देणे कठीण झाले आहे.





विशेष म्हणजे एखादी फळबाग उभी करण्यासाठी शेतकऱ्याला अनेक वर्षे मेहनत घ्यावी लागते. एकदा बागेतील झाडे वाळली तर पुन्हा नवीन झाडे लावून उत्पादनक्षम बाग तयार करण्यासाठी मोठा कालावधी आणि आर्थिक गुंतवणूक करावी लागते. त्यामुळे सध्या फळबागांना पाणी उपलब्ध करून देणे ही शेतकऱ्यांसाठी केवळ शेतीची बाब नसून त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न बनला आहे.

आमदार यावलकर यांनी मुख्यमंत्र्यांकडे मांडली शेतकऱ्यांची व्यथा

या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे विशेष मागणी केली होती. ड्रायझोनच्या निर्बंधांमुळे शेतकऱ्यांना नवीन बोअरवेल करण्यास अडचणी येत आहेत. मात्र, फळबागा वाचविण्यासाठी पाण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे संत्रा, मोसंबी व इतर फळबागा असलेल्या शेतकऱ्यांना आवश्यक त्या अटी व शासकीय परवानगीच्या अधीन राहून बोअरवेल करण्याची विशेष मुभा देण्यात यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली होती. शेतकऱ्यांच्या अडचणी आणि फळबागांचे आर्थिक महत्त्व लक्षात घेऊन शासनाने या विषयावर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली होती.

मुख्यमंत्र्यांची महत्त्वपूर्ण घोषणा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ८ नोव्हेंबर रोजी नागपूर जिल्ह्यातील लोहारी सावंगा येथे शेतकऱ्यांशी संवाद साधताना फळबागा वाचविण्यासाठी बोअरवेलवरील निर्बंध तात्पुरते शिथिल करण्याची घोषणा केली. फळझाडे मोठी होऊन उत्पादन देण्याच्या स्थितीत येण्यासाठी १० ते १२ वर्षांचा कालावधी लागतो. त्यामुळे पाण्याअभावी ही झाडे नष्ट होऊ नयेत, यासाठी विशेष उपाययोजना आवश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

या घोषणेनुसार फळबागा असलेल्या दुष्काळग्रस्त भागात १५ डिसेंबर २०२६ पर्यंत विशेष सवलत देण्यात येणार असून त्यासाठी संबंधित प्रशासनाची परवानगी आणि भुजल उपशावर देखरेख ठेवली जाणार आहे. ही सवलत सरसकट नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

शेतकरी वर्गातून समाधान; प्रत्यक्ष अंमलबजावणीकडे लक्ष

आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी मांडलेल्या या मागणीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेमुळे वरुड-मोर्शी परिसरातील फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. अनेक वर्षांच्या मेहनतीने उभ्या केलेल्या संत्रा बागा वाचविण्यासाठी ही सवलत महत्त्वाची ठरू शकते.

दरम्यान, या घोषणेची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी होणार, कोणत्या गावांचा समावेश राहणार, परवानगी देण्याची प्रक्रिया काय असेल आणि शेतकऱ्यांना कोणत्या अटींची पूर्तता करावी लागेल, याबाबत शासनाच्या अधिकृत आदेशाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

फळबागा वाचल्या तरच शेतकऱ्यांचे अर्थकारण टिकेल!

दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न शासनदरबारी मांडणे आणि फळबागांच्या संरक्षणासाठी विशेष सवलतीची मागणी करणे, हा या प्रश्नातील महत्त्वाचा भाग ठरला आहे. आता शासनाच्या घोषणेची प्रभावी अंमलबजावणी होऊन पात्र शेतकऱ्यांना वेळेत परवानगी मिळाल्यास हजारो फळझाडांना जीवनदान मिळण्याची आशा आहे. शेतकऱ्यांच्या मागणीला शासनस्तरावर मिळालेल्या या प्रतिसादाबद्दल परिसरातील शेतकरी आणि नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

घरावर सिरिज टाकत असतांना विद्युत शॉक लागुन दादाराव ईखे यांचा दुर्देवी मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



वरुड – शहरातील वृंदावन नगर परिसरात दादाराव ईखे नामक ईसमाचा विद्युत शॉक लागुन धक्कादायक मृत्यू झाल्याची घटना आज दुपारच्या सुमारास घडल. ऐन दिवाळीच्या आधल्या दिवशी घडलेल्या या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

मुळचे वरुड तालुक्यातील नांदगाव येथील रहिवाशी असलेले दादाराव बाबाराव ईखे (४९) यांनी शुन्यातून विश्व निर्माण करीत स्वत:चे अस्तित्व वरुड शहरात निर्माण केले होते. शहरातील वृंदावन नगर परिसरात स्वत:च्या घरी दिवाळी निमित्ताने सिरिज टाकत असतांना घराशेजारुनच गेलेल्या मोठया विद्युत वाहिनीचा त्यांच्या सिरिजला स्पर्श झाला आणि दादाराव यांना जोराचा झटका बसला. अपघात घडताच कुटूंबिय व परिसरातील नागरिकांनी त्यांना गंभिरावस्थेत त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल केले परंतु तत्पुर्वीच त्यांना मृत्यू झाला होता. यासंदर्भात वरुड पोलिसांनी आकस्मिक मृत्यू नोंद केली असुन पुढील तपास सुरु आहे. त्यांच्या मागे पत्नी, बहिण, जावई, २ मुले असा आप्तपरिवार आहे. अचानक दादाराव यांच्या अचानक निधनाने वरुड शहरासह नांदगावमध्ये शोक व्यक्त केल्या जात आहे. आज सायंकाळच्या सुमारास त्यांच्या पार्थिवावर केदारेश्वर मोक्षधाम येथे स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक आणि शहरवासियांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

भीषण आगीत ६ जणांचा मृत्यू : धाराशिवमध्ये दुकानाला लागलेल्या आगीत कुटुंबातील एकमेव बचावला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



धाराशिव – दिवाळीचा सण संपूर्ण राज्यात आनंदाने आणि उत्साहात साजरा होत असताना, धाराशिव जिल्ह्यातील येडशीमध्ये भीषण आगीची दुर्घटना घडली. येडशी गावात किराणा दुकानाला लागलेल्या भीषण आगीत करंडे कुटुंबातील तब्बल सहा जणांचा गुदमरून दुर्दैवी मृत्यू झाला. या संपूर्ण दुर्घटनेत १८ वर्षीय कृष्णा करंडे हा एकमेव कुटुंबातील सदस्य मृत्यूच्या दाढेतून परत आला. किराणा दुकानाच्या वरच्या मजल्यावर करंडे कुटुंब राहत होते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घरात लावलेल्या पणत्यांमुळे ही भीषण आग लागली. आगीने अवघ्या काही वेळातच रौद्र रूप धारण केले. ज्या ठिकाणाहून घराबाहेर पडण्याचा मुख्य रस्ता होता, नेमकी त्याच भागात आग भडकल्याने घरातील कोणालाही खाली उतरता आले नाही. धुराचे दाट लोट आणि प्रचंड उष्णतेमुळे कुटुंबातील सहा जणांचा जागीच गुदमरून मृत्यू झाला. घटना घडल्यानंतर गावकऱ्यांनी मध्यरात्रीपासूनच आणि अग्निशमन दलाने आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, आगीची तीव्रता प्रचंड असल्याने इतरांचे प्राण वाचवता आले नाहीत.







